# लिव्ह इन आणि लग्न

"लिव्ह-इन ही गोष्ट वेगाने लोकप्रिय होत असल्याने आता हळूहळू लग्न ही व्यवस्था समाजातून नाहीशी होईल असं वाटतं का?", हा प्रश्न मला सगळीकडे विचारला जातोच. पुणे असो वा मुंबई, नाशिक असो वा नागपूर. मला आठवतं पंधरा-सोळा वर्षांपूर्वी 'लिव्ह-इन' विषयी जाहीरपणे विशेष चर्चाही होत नसे. लग्नाशिवाय मुलगा आणि मुलगी एकत्र राहतात ही गोष्ट सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबात स्वीकारली जाणे जवळपास अशक्यच होते. सिनेतारे आणि तारका अशा प्रकारे लिव्ह-इन मध्ये राहतात वगैरे गोष्टी मनोरंजन म्हणून चघळल्या जात, पण या तथाकथित उच्चभ्रू लोकांच्या गोष्टी आपल्या घराच्या उंबरठ्याच्या आत येतील असं मात्र फारसं कोणाला वाटत नसे. पण या नव्या शतकाच्या पहिल्या पंधरा वर्षांचा वेग हा आधीच्या शंभर वर्षांइतका होता. 'लिव्ह-इन' ही गोष्ट वेगाने तरुणांच्या डोक्यात आणि हळूहळू उंबरठ्याच्या आतही आली. हा रेटा इतका जबरदस्त होता की ज्या गोष्टीवर फारशी चर्चाही होत नसे त्या गोष्टीमुळे लग्नसंस्थेसारखी एक प्राचीन व्यवस्था धोक्यात आली आहे की काय असा प्रश्न अनेकांना पडू लागला आहे.

या प्रश्नाला अनेक कंगोरे आहेत. हा प्रश्न पडणाऱ्या अनेकांच्या मनात 'लिव्ह-इन' संकल्पनेबाबत अविश्वास आहे, तर काहींच्या मनात स्त्री-पुरुष समानतेच्या विचारांनी सकारात्मक कुतूहल आहे. एका बाजूला या 'लिव्ह-इन' प्रकारामुळे समाजाची वीण उसवण्याची भीती आहे तर काहींच्या दृष्टीने हा लग्नामुळे स्त्रियांना वर्षानुवर्षे ज्या दास्यात राहावं लागलं आहे त्यातून मुक्त होण्याचा मार्ग आहे. आणि बहुतांश सामान्य लोक हे या दोन टोकांच्या मध्ये कुठेतरी संभ्रमावस्थेत आहेत. मी विवाह या विषयातली अभ्यासक या नात्याने या सगळ्याचा थोडा सविस्तर अभ्यास करण्याचं ठरवलं. अनेक मुला-मुलींशी बोलले. त्यांचे विचार समजून घेतले. आणि या सगळ्यातून मी या ठाम निष्कर्षाला आले आहे की, कात टाकत, आपले रूप बदलत लग्नसंस्था ही व्यवस्था आपल्या समाजात टिकून राहणार. लग्नसंस्थेचे स्वरूप आजवर कित्येकदा बदलले आहे आणि तसेच ते पुढे बदलतही राहिल. पण ती समूळ नष्ट होईल काय? मुळीच नाही.

मी या निष्कर्षावर का आले यासाठी सर्वप्रथम लग्न व्यवस्था अस्तित्वात येण्याची कारणमीमांसा बघूया. सामान्यतः इतिहासकार सांगतात, टोळ्यांमध्ये माणूस होता तेव्हा मानव समूहाची रचना ही मातृसत्ताक होती. टोळ्यांमधील लहान मुलं ही आईच्या नावे ओळखली जात असत. कारण तेच शक्य होतं! हळूहळू टोळ्या स्थिरावल्या आणि शेती करू लागल्या. शेतीत राबू लागला पुरुष आणि स्त्रिया आपोआप मदत करू लागल्या. शेतीमुळे जमीन मालकी हक्क तयार झाले. 'प्रॉपर्टी'तयार झाली. पुरुष ज्या जमिनीतून अन्न निर्माण करतो ती जमीन त्याच्याच मुलाला मिळायला हवी अशा विचाराने वारसाहक्क तयार झाला. आणि या वारसाहक्काच्या भावनेतून माझी संतती नेमकी कोणती हे कळण्यासाठी 'विवाह'पद्धती निर्माण झाली असावी. टोळी हे एकच कुटुंब असणारी व्यवस्था जाऊन अनेक छोट्या कुटुंबांचा एक समाज बनू लागला. कुटुंब हा समाजाचा पाया बनला. आणि कुटुंबाची सुरुवात लग्नाने होऊ लागली. साहजिकच लैंगिक आयुष्याची

सुरुवातही लग्नापासूनच होणे इष्ट मानले जाऊ लागले. आणि काही हजार वर्षांत आपण ही व्यवस्था पक्की रुजवली, इथल्या मातीत भिनवली. हा इतिहास लक्षात घेतल्यास लग्नाची दोन महत्वाची कार्ये समोर येतात एक म्हणजे लैंगिक आयुष्याची सुरुवात आणि पुढील पिढीची निर्मिती व देखभाल. आजही लग्नाचा उद्देश याहून पलीकडे गेला आहे असं मानायची गरज नाही. आमच्या बहुतांश सर्व मुला-मुलींच्या गटचर्चांत ‘लग्न का करायचं?’ या प्रश्नावर मुला-मुलींना ठोस आणि नेमकं उत्तर देता येत नाही. आयुष्यभराचा सोबती, सुख-दुःख वाटून घेणारा जोडीदार, सोल-मेट वगैरे वगैरे पुस्तकी शब्दांची उधळण होते पण वर उल्लेखलेल्या दोन प्रमुख उद्देशांवर फार कमी जण येतात. माझ्या मते, ज्या क्षणी आपण लग्न का करायचं याचं तर्कशुद्ध इंग्रजीत ज्याला रॅशनल म्हणतात असं उत्तर स्वतःला देऊ शकू त्याक्षणी आपण लग्नासाठी तयार आहोत असं समजावं. वर उल्लेखलेल्या दोन उद्देशांपैकी पहिल्या बाबतीत समाजव्यवस्था मुळीच लवचिक नाही आणि दुसऱ्या बाबतीत आजची आपली कायदे व्यवस्था लग्न-संस्थेला विशेष महत्व देते. आणि कायदेव्यवस्था व समाजव्यवस्था या एकमेकींपासून फार काळ फटकून राहू शकत नाहीत. याचाच परिपाक म्हणजे नुकतेच काही खटल्यांत न्यायालयांत लिव्ह-इन मध्ये राहणाऱ्या जोडप्यांचा दर्जा हा विवाहीत जोडप्यांसारखा धरला जावा असा निकाल दिला. नवरा-बायकोप्रमाणे पण लग्न न करता एकत्र राहणाऱ्या जोडप्यांत वारसाहक्क, वेगळे होताना जोडीदाराला निराधार करण्यासारखे घडलेले प्रकार यामुळे न्यायालयाने ही पावले उचलली हे आपण नाकारू शकत नाही. थोडक्यात ज्याला समाजाच्या फार विरोधात जाऊन आपले लैंगिक आयुष्य सुरु करायचे नाही, ज्याला आपल्या वारसाहक्कांमध्ये बाधा यायला नको आहे अशा कोणत्याही माणसासाठी लिव्ह-इन मध्ये पडणे हिताचे नाही. काही बंडखोर सगळीकडे असतात तसेच याही बाबतीत असतील. पण म्हणून सगळा समाजच मूलभूत उद्देश पूर्ण करणाऱ्या लग्नसंस्थेला नाकारेल असं मला वाटत नाही. हे चूक, हे बरोबर असे ठोस काळे-पांढरे ठरवता येत नाही.  ज्याने त्याने आपला एखादी कृती करतानाचा उद्देश काय आहे हे पारखून कृती करावी इतकीच स्वच्छ अपेक्षा आपण ठेवली पाहिजे. आणि त्या दिशेने सहकार्यही केलं पाहिजे.

माझ्या पिढीतल्या बहुतेकांचा असा समज असतो की लिव्ह-इन म्हणजे कसलंच बंधन नाही. आज वाटलं एकीबरोबर राहतोय, उद्या दुसरी व्यक्ती. पण एका गप्पांमध्ये स्वप्नील म्हणाला ते मला वाक्य अवडलं- “आम्ही आधीच्या पिढीसारखे अगदी एकनिष्ठ नसू कदाचित. आमच्यातले अनेकजण ‘ट्रायल अँड एरर’ करून झालेले पण असतील. पण आम्ही आमच्या जोडीदाराशी निष्ठावान नाही असं नाहीये. आमच्या निष्ठा समजून घ्या”. आज ‘लिव्ह-इन’ मध्ये दिसणाऱ्या स्वातंत्र्याच्या शक्यतेमुळे आज अनेकांना ते आकर्षक वाटतं हे मला मुळीच आश्चर्याकारक वाटत नाही. लिव्ह-इन म्हणजे अमुक अमुक असं लेबल करणं मी सोडलंय. आपल्या कृतीचा उद्देश काय आहे याकडे या नव्या पिढीने लक्ष द्यायचं ठरवलं तर ‘प्रत्येक लग्नात हे लिव्ह-इन चे फायदे निर्माण करता येऊ शकतात, पण लिव्ह-इन मध्ये लग्नाचे फायदे मिळवता येत नाहीत’ हे त्यांच्याच लक्षात येईल, आजही येतेच आहे.

शेवटी जाता जाता एक गोष्ट सांगावी वाटते. मागे महाराष्ट्र टाईम्सच्या 'संवाद' पुरवणीत मी सदर लिहित होते तेव्हा 'सेकंड इनिंग'विषयी, म्हणजे दुसरे लग्न करणाऱ्यांविषयी लिहिलं. त्यावेळी ज्येष्ठ नागरिकांच्या एकटेपणाविषयी मी बोलले होते. आज थोडे धाडस करूनच लिहिते आहे, मला वाटतं, एकट्या ज्येष्ठ नागरिकांनी आपल्यासाठी जोडीदार शोधून सेकंड इनिंगची सुरुवात जरूर करावी पण कायदेशीर लग्नाच्या व्यवस्थेत शिरण्याऐवजी निव्वळ सोबतीच्या दृष्टीने लिव्ह-इनचा पर्याय निवडावा. लिव्ह-इन ही गोष्ट तरुणांपेक्षा ज्येष्ठांसाठीच अधिक उपयुक्त ठरेल असं माझं मत आहे! वारसाहक्क, वाद, त्या वयात नवीन कुटुंबांशी जुळवून घेणं या गोष्टी तर टाळता येतीलच आणि आयुष्याची संध्याकाळ नवीन जोडीदारासोबत शांततापूर्ण पद्धतीने घालवता येईल. बघा विचार करून!